उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत असलेल्या मैत्री कक्षाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माध्यम आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

शासन निर्णय क्रमांकः मेईम-२०२३/प्र.क्र.४६ /उद्योग-३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २३ ऑगस्ट, २०२४

वाचा :

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः मावज-२०२१/प्र.क्र.१२६/कार्यासन-३४, दि.१३.०८.२०२१

२) उद्योग संचालनालयाचे पत्र: उसं/मैत्री/मैत्री माध्यम आराखडा २०२४-२५/२०२४/२६२, दि.०२.०५.२०२४

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. ०९.०८.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :

उद्योग संचालनालयातर्गत महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणुक सुविधा कक्ष (मैत्री कक्ष) निर्माण करण्यात आलेला आहे. सदर कक्षामार्फत विविध उद्योजकांना व गुंतवणुकदारांना राज्य शासनामार्फत व्यवसाय सुलभीकरणासाठी केलेल्या उपाययोजना, उपलब्ध सुविधा इत्यादी माहिती होण्यासाठी प्रसिध्दी करण्यात येते. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मैत्री कक्षाच्या २८५२ ए०२२ या लेखाशिर्षांतर्गत २६- जाहिरात व प्रसिध्दी या उद्धिष्टाखाली रु. १२.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या उपरिक्त संदर्भ क्र.१ येथील नमूद दि.१३.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जाहिराती वितरण धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार उद्योग प्रभागांतर्गत मैत्री कक्षाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि.०८.०८.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

उद्योग संचालनालयातर्गत असलेल्या मैत्री कक्षाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. ०९.०८.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मंजूरी देण्यात आलेल्या माध्यम आराखड्यास तसेच तो राबविण्यासाठी येणा-या रु.१०,६२,२०,०००/- (अक्षरी रुपये दहा कोटी बासष्ट लाख वीस हजार फक्त) इतक्या खर्चास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. या प्रचार व प्रसिध्दी माध्यम आराखड्यानुसार येणा-या अंदाजित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

उद्योग विभाग (मैत्री कक्ष)							
जाहिरात / क्रिएटिव्ह निर्मीतीचा तपशील व खर्च (तक्ता-अ)							
अ.क्र.	क्रिएटिव्ह निर्मीती		दर	संख्या	अंदाजित खर्च (रुपये)	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम
१	प्रिंट आणि बाह्य माध्यमासाठी आवश्यक क्रिएटिव्ह निर्मीती आणि ॲडॅप्टेशन		१०,०००	३०	३,००,०००	५४,०००	३,५४,०००
२	माहितीपट: ४ मिनिटांचे प्रशिक्षण/ यशोगाथा व्हिडिओ		९,७५,०००	४	३९,००,०००	७,०२,०००	४६,०२,०००
३	टीव्हीसी ६० सेकंद		७,००,०००	५	३५,००,०००	६,३०,०००	४१,३०,०००
४	ऑडीओ जिंगल/ स्पॉट निर्मीती ६० सेकंद		४५,०००	५	२,२५,०००	४०,५००	२,६५,५००
एकूण					**७९,२५,०००**		**९३,५१,५००**
जाहिरात प्रसारणासाठीचा तपशील व खर्च (तक्ता-ब)							
अ.क्र.	माध्यम	तपशील	दर	वारंवारीता/ कालावध	अंदाजित खर्च (रुपये)	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम
१	दैनिकांतून जाहिरात (वृत्तपत्र)	राज्यातील व राज्याबाहेरील वृत्तपत्रांमधून जाहिरातीद्वारे प्रसिध्दी (राज्यातील मोठी, मध्यम व लघु संवर्गातील निवडक दैनिके)	शासन मान्य दर	५ दिवस	५०,००,०००	२,५०,०००	५२,५०,०००
२	वृत्त वाहिन्या जाहिरात प्रसारण	४५-६० सेकंद जाहिरातीचे प्रसारण- प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	४०,००,०००	७,२०,०००	४७,२०,०००
३	डी.जी.आय.पी.आर. होर्डींग्ज	--	डी.जी.आय.पी.आर.	३० दिवस	८,००,०००	१,४४,०००	९,४४,०००
४	खाजगी होर्डींग्ज	एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	८५,००,०००	१५,३०,०००	१,००,३०,०००

		करुन घेण्याचे प्रस्तावित					
५	मुंबईमधील बेस्ट बसेसद्वारे प्रसिध्दी फुल wrappers	एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	२०,००,०००	३,६०,०००	२३,६०,०००
६	मुंबई मधील Best Shelter	एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	४०,००,०००	७,२०,०००	४७,२०,०००
७	पुणे महापालिकेच्या बस wrappers	एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	२०,००,०००	३,६०,०००	२३,६०,०००
८	नवी मुंबईतील महापालिका परिवहन विभागाच्या बस wrappers	एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	२०,००,०००	३,६०,०००	२३,६०,०००
९	जिल्हास्तरीय व्यवसाय कार्यशाळा (District Business Summit)	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रसिद्धी करण्यात येईल. या माध्यमांच्या संस्थांनी निविदामध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करणे प्रस्तावित	विहित ई निविदा प्रक्रियेद्वारे	३० दिवस	६०,००,०००	१०,८०,०००	७०,८०,०००
१०	अधिकाऱ्यांकरीता कार्यशाळा	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रसिद्धी करण्यात येईल. या माध्यमांच्या संस्थांनी निविदामध्ये नमूद	विहित ई निविदा प्रक्रियेद्वारे	३० दिवस	४०,००,०००	७,२०,०००	४७,२०,०००

		केलेल्या दराने प्रसिद्धी करणे प्रस्तावित					
११	मोबाईल किऑस्कवरुन प्रसिद्धी	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रसिद्धी करण्यात येईल. या माध्यमांच्या संस्थांनी निविदामध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करणे प्रस्तावित	विहित ई निविदा प्रक्रियेद्वारे	३० दिवस	४०,००,०००	७,२०,०००	४७,२०,०००
१२	ओला उबेर टॅक्सीद्वारे प्रसिध्दी	एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित	सीबीसी (डीएव्हीपी)	३० दिवस	१,००,००,०००	१८,००,०००	१,१८,००,०००
१३	चित्ररथ (मोबाईल) व्हॅनद्वारे प्रसिध्दी	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रसिद्धी करण्यात येईल. या माध्यमांच्या संस्थांनी निविदामध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करणे प्रस्तावित	विहित ई निविदा प्रक्रियेद्वारे	३० दिवस	१,५०,००,०००	२७,००,०००	१,७७,००,०००
१४	सोशल मिडीया	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रसिद्धी करण्यात येईल. या माध्यमांच्या संस्थांनी	विहित ई निविदा प्रक्रियेद्वारे	३० दिवस	९०,००,०००	१६,२०,०००	१,०६,२०,०००

		निविदामध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करणे प्रस्तावित					
१५	डिजीटल मिडीया, ओटीटी माध्यमाद्वारे प्रसिद्धी	शासन निर्णय दि.२३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्रसिद्धी करण्यात येईल. या माध्यमांच्या संस्थांनी निविदामध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करणे प्रस्तावित	विहित ई निविदा प्रक्रियेद्वारे	३० दिवस	४०,००,०००	७,२०,०००	४७,२०,०००
			एकूण तक्ता (ब)		८,०३,००,०००		९,४१,०४,०००
			एकूण (तक्ता अ + तक्ता ब)				१०,३४,५५,५००
	शासन निर्णय दि.१३.०८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिध्दी आराखड्यास एकूण खर्चाच्या ४ टक्के (रु. २० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २ टक्के (उर्वरित रकमेवर रु. ५ कोटी वजाजाता या प्रमाणे)		प्रशासकीय व इतर खर्च				२७,६४,५००
			एकूण (सर्व करांसह)				**१०,६२,२०,०००**

२. प्रस्तुत बाबींकरिता होणारा खर्च मागणी क्र. के-७, मुख्य लेखाशिर्ष २८५२, उद्योग-८०, सर्वसाधारण १०२, औद्योगिक उत्पादकता (००)(१५), मैत्री कक्षाकरिता खर्च (योजनांतर्गत) २८५२ ए०२२ मध्ये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर तरतुदीमधून भागविण्यात येईल.

३. सन २०२४-२५ मध्ये प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) तथा अध्यक्ष, मैत्री कक्ष यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने विषयांकीत देयके विकास आयुक्त (उद्योग) तथा अध्यक्ष, मैत्री कक्ष यांच्या कार्यालयाकडे थेट सादर करण्यात यावीत. विकास आयुक्त (उद्योग) यांनी प्रस्तुत कार्यक्रम राबविण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. तसेच सदर खर्च चालु आर्थिक वर्षामध्ये खर्ची पडावी, याबाबत दक्षता घेण्यात यावी आणि उपयोगिता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास सादर करण्याची कार्यवाही करावी.

४. प्रस्तुत प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेया शासन निर्णय/ आदेश/ परिपत्रके यानुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-१०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, दि.१७.०४.२०१५ अन्वये निर्गमित केलेल्या वित्तीय प्राधिकारानुसार नमूद अटी व शर्तींचे पालन करावे. तसेच उद्योग विभागाच्या खरेदी धोरणानुसार विहित तरतुदी व कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८२३१६०७५४५३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR. SHRIKANT
LAXMANRAO
PULKUNDWAR

Digitally signed by DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C10A1E6C8FBE08C1180978BD3ED8A151ED05202D522B09B9960341C2F080906D, cn=DR. SHRIKANT LAXMANRAO PULKUNDWAR
Date: 2024.08.23 18:13:37 +05'30'

(डॉ. श्री. ल. पुलकुंडवार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
९) विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई ४०० ०३२.
१०) महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),१/२,महाराष्ट्र ,मुंबई/नागपूर.
११) सर्व कार्यासने/ उद्योग प्रभाग, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अधिदान व लेखाधिकारी अधिकारी, मुंबई.
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४) निवडनस्ती (उद्योग-३)